जनसंपर्क कक्ष

पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 AUG 2018

# कार्बन क्रेडिटचा लाभ शेतकऱ्यांना द्यायला हवा

## राज्यस्तरीय कार्यशाळेत मान्यवरांनी मांडले मत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतात विशेषत: महाराष्ट्रात शेतकऱ्यांची स्थिती विदारक आहे. शेती प्रतिकूल स्थितीत करावी लागत आहे. त्यामुळेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. शेतकऱ्यांचा सक्षम करण्यासाठी विविध क्षेत्रांतील ज्ञानवंतांनी त्यांच्या ज्ञानाचा उपयोग शेतकऱ्यांसाठी करायला हवा. कार्बन क्रेडिटचा लाभ शेतकऱ्यांना थेट द्यायला हवा, असे मत गुरुवारी झालेल्या राज्यस्तरीय कार्यशाळेत मान्यवरांनी मांडले.

शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र अधिविभाग आणि शेतकरी संघटनेच्या वतीने विद्यापीठाच्या भाषा भवन सभागृहामध्ये झालेल्या 'कार्बन क्रेडिट्स आणि जल व्यवस्थापन' या कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. यावेळी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथदादा पाटील उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, भारत हा शेतीप्रधान देश असून, शेतीच्या बळावर देशाला मोठ्या प्रमाणावर कार्बन क्रेडिट्स मिळविणे शक्य आहे. एक लिटर पाणी वापरत असताना त्यातून चार ते पाच लिटर सांडपाणी आपण तयार करतो. पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळणे ही एक सामाजिक जबाबदारी आहे.



कोल्हापूर : कार्यशाळेत बोलताना रघुनाथदादा पाटील. व्यासपीठावर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. विलास नांदवडेकर आदी मान्यवर.

### शेतकऱ्यांना विकासाचे भागीदार करावे

शेतकरी संघटनेचे पाटील म्हणाले, पिकांमुळे वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईड नष्ट केला जातो आणि ऑक्सिजन निर्माण केला जातो. कार्बन आणि पाण्यामुळे साखर बनते. त्यामुळे शेतकरी हाच प्रदूषणमुक्तीसाठी प्रमुख पर्याय आहे. त्यामुळे त्यांना विकासाचे भागीदार करून लाभ द्या.

रघुनाथदादा पाटील म्हणाले, शेतकरी हा खरा संशोधक आहे. शेतीच्या माध्यमातून अन्नधान्यांच्या विविध वाणांचा प्रयोगांती शोध लावून पिकविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असतो. शेतकऱ्यांनी लावलेल्या कोट्यवधी झाडांचे पर्यावरणीय मूल्य मिळणार असेल तर शेतकरी आत्महत्या थांबण्यास ते उपयुक्तच ठरेल.

पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. डी. आर. मोरे, अधिष्ठता डॉ. पी. एस. पाटील आदींसह सोलापूर, पंढरपूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, नाशिक, बीड आदी जिल्ह्यांतील शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

सकाळ

## शेतकरी हा खरा संशोधक

**कोल्हापूर :** शेतकरी हा खरा संशोधक आहे, असे प्रतिपादन शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथदादा पाटील यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र अधिविभाग आणि शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कार्बन क्रेडिटस् आणि जल व्यवस्थापन' या राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित होते. भाषा भवन सभागृहात कार्यशाळा झाली.

सविस्तर वृत्त पान ६ »

13 AUG 2018

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शेतकरी हा खरा संशोधक

## रघुनाथदादा पाटील; 'कार्बन क्रेडिटस्'वर विद्यापीठात कार्यशाळा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २ : शेतकरी हा खरा संशोधक आहे, असे प्रतिपादन शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथदादा पाटील यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र अधिविभाग आणि शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कार्बन क्रेडिट्स आणि जल व्यवस्थापन' या राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित होते. भाषा भवन सभागृहात कार्यशाळा झाली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ''शेतीच्या बळावर देशाला मोठ्या



रघुनाथदादा पाटील

प्रमाणावर कार्बन क्रेडिट्स मिळविणे शक्य आहे. मानवाने औद्योगिकीकरणाला सुरुवात केल्यापासून निसर्गाच्या साधनसंपत्तीच्या रक्षणाकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे वातावरणातील कार्बनडायऑक्साईडचे प्रमाण जास्त झाले आहे. औद्योगिकीकरणास सुरुवात करणाऱ्या विकसित राष्ट्रांनी याची जबाबदारी घेतली नाही. त्यामुळे ही जबाबदारी विकसनशील देशांकडे आली. यामधून जागतिक प्रदूषण कमी करण्याचा विचार पुढे आला. या प्रदूषण कमी करण्याच्या प्रक्रियेस कार्बन क्रेडिट म्हणतात. विविध उद्योगधंदे व इतर माध्यमांतून कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण अधिक झाल्याने ते साठवणूक करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.''

शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. बालेखान मुजावर, डॉ. गिरीश राऊत, डॉ. प्रणाली राऊत, डॉ. ए. डी. जाधव उपस्थित होते. अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

### शेतातील झाडांचे मोल व्हावे

रघुनाथदादा पाटील म्हणाले, ''शेतीच्या माध्यमातून अन्नधान्यांच्या विविध वाणांचा प्रयोगांती शोध लावून पिकविण्यासाठी सातत्याने शेतकरी प्रयत्न करत असतो. शेतकऱ्यांनी लावलेल्या कोट्यवधी झाडांचे पर्यावरणीय मूल्य मिळणार असेल तर शेतकरी आत्महत्या थांबण्यास ते उपयुक्तच ठरेल. शेतकरी पिकांच्या माध्यमातून शेतीला पाणी देतो, म्हणजेच तो पृथ्वीचे तापमान कमी करण्यास सहकार्य करतो. देशातील विविध भागांमध्ये उपलब्ध परिस्थितीत शेतीच्या माध्यमातून देश जगविण्याचे महत्त्वाचे कार्य तो करतो.''

3 AUG 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्त्रियांच्या सन्मानाची सुरुवात कुटुंबापासून करा

## डी. टी. शिर्के : विद्यापीठातील 'शारदाबाई पवार' अध्यासनाची कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** स्त्रियांच्या सन्मानाची सुरुवात स्वतःच्या कुटुंबापासून केली, तर स्त्रियांवरील सर्व प्रकारचे हिंसाचार संपुष्टात येतील, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित केलेल्या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. राजर्षी शाहू महाराज यांनी दि. २ ऑगस्ट १९१९ रोजी आपल्या संस्थानामध्ये अमलात आणलेल्या 'कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्या'च्या शताब्दी वर्षानिमित्त या अध्यासनातर्फे कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेचा विषय 'राजर्षी शाहूंचा कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा' असा होता.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आज कुटुंबामध्ये स्त्रियांवरील हिंसाचाराच्या घटना मोठ्या प्रमाणात घडून येत आहेत. त्याची आकडेवारी भयावह असून समाजाला चिंता करायला लावणारी आहे. या कार्यक्रमास ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, मानसिंग टकले, ए. बी. मोहळकर, एम. व्ही. वाळ्वेकर, व्ही. एम. पाटील, आदी उपस्थित होते. श्रेयश मोहिते यांनी सूत्रसंचालन केले.

डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. सचिन पाटील, किरण शिंदे, शिल्पा चव्हाण, सरला हजारे, महादेवी भिसे यांनी कार्यशाळेचे संयोजन केले.

### तज्ज्ञांनी मांडले विचार

या कार्यशाळेतील डॉ. मंजूश्री पवार आणि तनुजा शिपूरकर यांनी 'छत्रपती शाहूंचा कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधाचा कायदा आणि आजचे वास्तव' या विषयावर विचार मांडले. अध्यक्षस्थानी 'शारदाबाई पवार अध्यासना'च्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील होत्या. दुसऱ्या सत्रात डॉ. मेघा पानसरे, ॲड आसावरी कुलकर्णी यांनी 'सध्या अस्तित्वात असलेला कायदा आणि आजचे वास्तव' या विषयाची मांडणी केली. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. नंदा पारेकर होत्या.

### आजही औचित्यता

राजर्षी शाहू महाराज यांनी शंभर वर्षांपूर्वी लागू केलेल्या कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याची औचित्यता आजही महत्त्वाची आहे. आपल्या संस्थानामध्ये कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी करणारे राजर्षी शाहू महाराज जगाच्या पुढे शंभर वर्षांनी विचार करणारे दूरदृष्टीचे राज्यकर्ते होते, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले. ते म्हणाले, या कायद्याच्या शतकपूर्तीनिमित्त या अध्यासन केंद्रातर्फे या कायद्याचे शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. त्याची सुरुवात या कार्यशाळेपासून झाली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 AUG 2018
पुढारी

# राजर्षी शाहूंचा कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा मार्गदर्शक

## कार्यशाळेतील मान्यवरांचा सूर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजर्षी शाहू महाराजांनी शंभर वर्षांपूर्वी लागू केलेला कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा हा आजही मार्गदर्शक असल्याचा सूर गुरुवारी मान्यवरांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्राच्या वतीने 'छत्रपती शाहूंचा कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधाचा कायदा आणि आजचे वास्तव' या विषयावर मानव्यशास्त्र सभागृहामध्ये एक दिवसीय कार्यशाळा झाली. राजर्षी शाहू महाराजांनी २ ऑगस्ट १९१९ रोजी आपल्या संस्थानात कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा लागू केला होता. या कायद्याच्या शताब्दीनिमित्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी आजच्या स्त्रियांच्या स्थितीविषयी परखड शब्दांत मते मांडली. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी डॉ. भारती पाटील होत्या.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शंभर वर्षापूर्वी स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा करणारे राजर्षी शाहू महाराज हे जगाच्या पुढे पाहून विचार करणारे दुरदृष्टीचे राज्यकर्ते होते. प्रत्येकाने स्वतःच्या कुटुंबापासून स्त्रियांचा सन्मान करण्याची भूमिका घेतली तर महिलांवरील अत्याचार संपुष्टात येईल.

यावेळी डॉ. मंजुर्षी पवार म्हणाल्या, अनादी काळापासून स्त्रियांवर अन्याय केला जातो. अन्याय करण्यासाठी हक्काचे साधन म्हणून पुरुषी मानसिकतेतून स्त्रियांचे शोषण आजही कायम आहे. यावेळी त्यांनी कायद्याची माहिती दिली.तनुजा शिपूरकर म्हणाल्या, महिलांना सतत छळाला सामोरे जावे लागते. महिलांनी कपडे कोणते घालायचे हेसुद्धा दुसऱ्यांनी ठरवले जाते. स्त्रियांना मनोरंजनाचे साधन म्हणून पाहिले जाते. बाहेरचा कोणाचाही राग पत्नीवर काढला जातो. मारहाण करणे हा तर अनेक पुरुषांना हक्कंच वाटतो. अशा या सततच्या छळामुळे स्त्रियांना मानसिक आजार जडत आहेत. डॉ. मेघा पानसरे, ॲड. आसावरी कुलकर्णी यांनीही महिलांच्या अडचणी आणि यासाठीचे मार्ग याची माहिती देताना कोणत्याही स्थितीत अन्याय सहन करू नये, असे आवाहन केले.

यावेळी डॉ. नंदा पारेकर, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. मानसिंग टकले आदींसह मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 AUG 2018
पुढारी

# अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे सोमवारी 'शाहिरी जागर'

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनाच्या वतीने 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे' यांच्या ९८ व्या जयंतीनिमित्त शाहिरी जागर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि. ६ ऑगस्ट रोजी सकाळी साडेअकरा वाजल्यापासून शिवाजी विद्यापीठातील वि.स. खांडेकर भाषा भवन येथे हा कार्यक्रम होईल. यात शाहीर सखाराम खोत (बंधू सखा), शाहीर विजय जगताप, शाहीर हिंदुराव पाटील, शाहीर शीलादेवी लोंढे, शाहीर दिलीप सावंत, शाहीर सखाराम चौगले यांचे सादरीकरण होणार आहे. याचा लाभ घेण्याचे आवाहन अध्याक्षसनाचे समन्वयक राजन गवस यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

3 AUG 2018

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'थर्ड पार्टी'तून संशोधनाला चालना

## मूल्यांकनाच्या कामाचे मिळाले ३५ लाख; सामंजस्य करारातून तज्ज्ञांसह विद्यार्थ्यांना मिळाली संधी

**Anuradha.kadam**
@timesgroup.com
Tweet : anuradhakadamMT

**कोल्हापूर :** राज्य सरकारच्या थर्ड पार्टी ऑडिट नियमानुसार सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित योजनांच्या पार्श्वभूमीवर मूल्यांकन करण्याच्या कामातून शिवाजी विद्यापीठाच्या खात्यात गेल्या वर्षभरात मानधनापोटी ३५ लाख रूपये जमा झाले आहेत. राज्य व जिल्हा प्रशासनासोबत शिवाजी विद्यापीठाने गेल्यावर्षी केलेल्या सामंजस्य करारान्वये वर्षभरात सरकारी प्रकल्प व योजनांसाठी विद्यापीठाच्या विविध विभागातील तज्ज्ञ प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांनी पूर्वमूल्यांकनाचा डेटा तयार करून दिला असून या मूल्यांकनाच्या आधारे सरकारच्या संबंधित विभागाने कामाची रचना केली आहे.

सरकारतर्फे राज्यभरात रस्ते, धरण प्रकल्प प्रस्तावित असतात. तसेच प्रदूषणमुक्ती योजना, घनकचरा व्यवस्थापन, सामाजिक प्रश्न, पर्यावरणसंबंधित उपक्रमांचे नियोजन सरकारच्या विभागाअंतर्गत सुरू असते. अशा प्रकल्प व योजनांचे प्रत्यक्ष काम सुरू करण्यापूर्वी थर्ड पार्टी ऑडिट करून घेणे सरकारी नियमानुसार बंधनकारक आहे. गेल्यावर्षी शिवाजी विद्यापीठ व राज्य तसेच जिल्हा प्रशासनामध्ये करण्यात आलेल्या सामंजस्य करारानुसार विद्यापीठाच्या अर्थशास्त्र, पर्यावरण, स्ट्रक्चरल, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, सामाजिक व राज्यशास्त्र या विभागाने या मूल्यांकनकामासाठी पुढाकार घेतला होता.

शिवाजी विद्यापीठाच्या कार्यकक्षेत समाविष्ट होणाऱ्या परिसरातील घनकचरा व्यवस्थापन याबाबत महापालिका प्रशासनाला विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाच्यावतीने मूल्यांकनाचे काम करून दिले. घनकचरा व्यवस्थापनाच्या खर्चाची रचना कशी असली पाहिजे, त्याचे आर्थिक बजेट कसे असले पाहिजे, या व्यवस्थापनावर होणाऱ्या खर्चाचा ताळमेळ कसा घातला पाहिजे याविषयक



मूल्यांकनाची प्रक्रिया विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाच्यावतीने करण्यात आली. अर्थशास्त्र विभागातील डॉ. विजय ककडे, डॉ. एम. एस. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापनाबाबत थर्ड पार्टी ऑडिट करण्यात आले. या मूल्यांकनाद्वारे मांडण्यात आलेले निष्कर्ष, सूचना प्रत्यक्ष ही योजना राबवण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या कामकाजात अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. २०१३ मध्ये राज्य सरकारच्यावतीने भूसंपादन कायदा करण्यात आला आहे. यानुसार राज्य सरकारतर्फे धरण, रस्ते यासारख्या प्रकल्पामध्ये जमीन संपादित केली जाणाऱ्या शेतकरी व नागरिकांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर प्रकल्पग्रस्तांशी संवाद साधून, त्यांच्या पुनर्वसनाच्या अपेक्षा जाणून घेऊन त्याबाबतचा अभ्यास अहवाल सरकारला देण्यासाठी जे मूल्यांकन करावे लागते हे कामही शिवाजी विद्यापीठाने कन्स्लटंन्सीच्या माध्यमातून यंदा पूर्ण केले.

आजरा तालुक्यातील पारपोली व आंबेओहोळ येथे करण्यात येणाऱ्या धरण प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी मूल्यांकन करण्यात आले आहे. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ओरोस, शेरवळ येथील रस्ते बांधणी प्रकल्पासाठी शिवाजी विद्यापीठातील स्ट्रक्चरल विभाग, अर्थशास्त्र विभागातर्फे मानधनपर सेवा देण्यात आली आहे. धरणग्रस्तांशी संवाद साधून एखाद्या सरकारी प्रकल्पाचा सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासही विद्यापीठातील तज्ज्ञ प्राध्यापकांनी मूल्यांकनाद्वारे सादर केला आहे. प्रकल्प सुरू करण्यापूर्वीच त्याचे काय परिणाम होऊ शकतात याचा अभ्यास यामध्ये अपेक्षित असल्यामुळे सरकारी यंत्रणेला यातील मुद्दे उपयुक्त ठरले आहेत. भूगोल विभागातर्फे भुदरगड येथील मॅपिंग करण्याचे काम संशोधनाच्या पातळीवर करण्यात आले आहे.

### यंदा एक कोटीचे उद्दिष्ट

सरकारी प्रकल्प व योजनांच्या पार्श्वभूमीवर अशाप्रकारे सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यासात्मक मूल्यांकन करण्याचा प्रयोग या सामंजस्य करारातून राज्यात प्रथमच शिवाजी विद्यापीठातर्फे राबवण्यात आला आहे. गेल्या वर्षभरात पर्यावरण, राज्यशास्त्र, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी तसेच समाजशास्त्र व राज्यशास्त्र या विभागातर्फे करण्यात आलेल्या थर्ड पार्टी ऑडिटमधून ३५ लाख रूपयांचा आर्थिक फायदा विद्यापीठ प्रशासनाला झाला आहे. यंदा या कामातून एक कोटी रूपये मानधन मिळवण्याचे उदिष्ट्य विद्यापीठ प्रशासनाने ठेवले आहे. त्यानुसार नियोजन करण्यात येणार आहे.

**"प्रदूषणमुक्तीसाठी सरकारच्या विविध स्तरावर काम सुरू आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाने मूल्यांकनाद्वारे अभ्यासू नोंदी सरकारला दिल्या आहेत. हानिकारक ठरणाऱ्या गोष्टींमध्ये ध्वनीप्रदूषणाचा आलेखही विद्यापीठाने सादर केला आहे. या प्रक्रियेत तज्ज्ञ प्राध्यापकांसोबत संशोधक विद्यार्थ्यांनाही काम करण्याची संधी मिळते. फिल्डवर्कसाठी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव व मानधन मिळते.**

**– प्रा. डॉ. विजय ककडे,**
अर्थशास्त्र विभाग

जनसंपर्क कक्ष
13 AUG 2018 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भाषिक कौशल्यांतूनच करिअरचा मार्ग

## वृत्तपत्र विद्या विभागात कानडे यांचे प्रतिपादन

कोल्हापूर टाइम्स टीम

'कोणत्याही प्रसारमाध्यमात काम करण्यासाठी भाषा उपयुक्त ठरते. भाषेवर प्रभुत्व असले तर प्रसारमाध्यमात चांगले करिअर करता येते. पत्रकारितेसाठी भाषिक कौशल्ये आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी ही कौशल्य आत्मसात करावीत,' असे आवाहन कोल्हापूर आकाशवाणी केंद्राच्या संचालक तनुजा कानडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व जनसंवाद विभागात आयोजित स्वागत समारंभात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विभागाच्या प्रमुख डॉ. निशा पवार होत्या. मानव्यशास्त्र सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात अर्जेंटिना येथील लघुपट स्पर्धेसाठी निवड झालेल्या प्रत्युष कुलकर्णी याचा सत्कार करण्यात आला.

कानडे म्हणाल्या, 'विद्यार्थ्यांनी कोणत्या माध्यमात करिअर करायचे आहे, हे ठरविण्यापूर्वी स्वतःला ओळखावे. ज्या क्षेत्रात जाणार आहात, त्या क्षेत्रात जीव ओतून काम करण्याची तयारी ठेवावी.'

स्वागत डॉ. निशा पवार यांनी केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. प्रियांका ऐवळे आणि दिग्विजय कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. अविनाश सुर्वे यांनी आभार मानले.




वृतपत्र विद्या व संवादशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आकाशवाणी केंद्राच्या संचालक तनुजा कानडे. यावेळी प्रा. डॉ. शिवाजी जाधव, प्रा. डॉ. निशा पवार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 AUG 2018
तरुण भारत




कोल्हापूर : पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात मार्गदर्शन करताना तनुजा कानडे. डावीकडून डॉ. निशा पवार, डॉ. शिवाजी जाधव.

# प्रसार माध्यमात काम करण्यासाठी भाषा उपयुक्त

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व जनसंवाद विभागातील नवोदित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभात उत्साहात पार पडला. मानव्यशास्त्र सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागाच्या प्रमुख डॉ. निशा पवार होत्या. मास. कम्युनिकेशनचा विद्यार्थी प्रत्युष कुलकर्णी याच्या लघुपटाची अर्जेंटिना येथील लघुपट स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रमुख पाहुण्या आकाशवाणी केंद्राच्या संचालिका तनुजा कानडे म्हणाले, कोणत्याही प्रसारमाध्यमात काम करण्यासाठी भाषा उपयुक्त ठरते. भाषेवर पकड असेल तर माध्यमांत चांगले करिअर करता येते.

डॉ. शिवाजी जाधव यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रियांका ऐवळे आणि दिग्विजय कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. अविनाश सुर्वे यांनी आभार मानले. दुपारच्या सत्रात विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यामध्ये बी. जे., एम. जे. आणि एम. ए. मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 AUG 2018
महाराष्ट्र टाइम्स

# आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी डॉ. बिलावर यांची निवड



कोल्हापूर : थायलंड-बँकॉक येथे ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी शिवाजी विद्यापीठाचे सहायक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांची निवड झाली. ७ ते १० ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या या परिषदेत डॉ. बिलावर 'इनोव्हेटिव्ह प्रॅक्टिसेस अंडरटेकन बाय लायब्ररीयन टू मॅग्नेटाईझ मोअर रीडर्स टुवर्डस द लायब्ररी..अ सर्व्हे इन इंडिया' या विषयावर संशोधनात्मक प्रबंध सादर करणार आहेत. या परिषदेत ते एका सत्राचे अध्यक्षस्थानही भूषविणार आहेत.